# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः23.09.2024** **वारःसोमवार**

---

- परदेशस्थ भारतीय हे भारताचे राष्ट्रदूत आहेत आणि ते भारताचे सर्वांत उत्तम राजदूत म्हणून काम करत आले आहेत, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं न्यूयॉर्कमध्ये प्रतिपादन
- भारत-अमेरिका पहिल्या सेमीकंडक्टर प्रकल्पावर दोन्ही देशांची सहमती.
- श्रीलंकेत अध्यक्षपद निवडणुकीत नॅशनल पीपल्स पॉवर पक्षाचे प्रमुख अनुरा कुमार डिस्सानायके विजयी.
- हंगेरीत बुडापेस्ट इथं 45 व्या बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये भारताच्या पुरुष आणि महिला या दोन्ही संघांची सुवर्णपदक मिळवून ऐतिहासिक कामगिरी.

मोदी अमेरिका कार्यक्रम

परदेशस्थ भारतीय हे भारताचे राष्ट्रदूत आहेत आणि ते भारताचे सर्वांत उत्तम राजदूत म्हणून काम करत आले आहेत, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल रात्री केलं. न्यूयॉर्कमधील लॉग आयलंडमधील नसाऊ सभागृहात भारतीय समुदायातर्फे आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

भारत आणि अमेरिकेतल्या द्विपक्षीय संबंधांमध्ये अनिवासी भारतीय समुदायानं बजावलेल्या भूमिकेचं त्यांनी कौतुक केलं. जगासाठी एआय म्हणजे आर्टिफिशिअल इंटेलेजिन्स म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता असा अर्थ आहे, पण आपण एआय म्हणजे अमेरिकन-इंडियन स्पिरिट म्हणजे अमेरिकी भारतीयांची वृत्ती असं मानतो असं ते म्हणाले. अमेरिकेतल्या भारतीयांनी अमेरिकेला भारतीयांशी जोडलं आहे आणि त्यांचं कौशल्य आणि बुद्धिमत्ता अतुलनीय आहेत, असंही त्यांनी स्पष्ट केलं.
बोस्टन आणि लॉसएंजलिस इथं दोन भारतीय दूतावास सुरू केले जातील, अशी घोषणा पंतप्रधानांनी या प्रसंगी केली. भारताचे सध्या न्यूयॉर्क, अटलांटा, शिकागो, ह्युस्टन, सॅन फ्रान्सिस्को आणि सिएॅटल इथं दूतावास आहेत. पंतप्रधानांनी ह्युस्टन विद्यापीठात थिरुवल्लूर तमीळ भाषा अध्यासन सुरू करत असल्याचीही घोषणा केली.

भारतात जगभरातील भाषा, धर्म आणि पंथांचे लोक राहतात, पण तरीही देशात एकात्मता नांदते, असं मोदी म्हणाले. भारतीय संस्कृतीमध्येच वैविध्य समजून घेणं, ते जगणं आणि त्याचा दैनंदिन आयुष्यात समावेश करणं या गोष्टी समाविष्ट असल्याचं निरीक्षण त्यांनी मांडलं.

पीयूएसएचपी म्हणजे पुष्प हा मंत्र भारताला विकसित बनवण्यासाठीचा मंत्र आहे, असं मत मोदी यांनी मांडलं. त्यातील पी म्हणजे प्रोग्रेसिव्ह किंवा प्रगत, यू म्हणजे अनस्टॉपेबल किंवा थांबवता न येणारा, एस म्हणजे स्पिरिच्युअल किंवा आध्यात्मिक भारत, एच म्हणजे ह्युमॅनिटी फर्स्ट किंवा मानवता प्रथम आणि पी म्हणजे प्रॉस्परस किंवा संपन्न भारत अशी मांडणी त्यांनी केली.

या कार्यक्रमाला पंधरा हजारपेक्षा जास्त नागरिक उपस्थित होते. मोदी यांच्या भाषणापूर्वी एक सांस्कृतिक कार्यक्रमही आयोजित करण्यात आला होता. पंतप्रधानांनी सभागृहात प्रवेश केल्यानंतर आणि त्यांच्या भाषणादरम्यानही नागरिकांनी मोदी मोदी अशा घोषणा दिल्या.

भारतीय सेमीकंडक्टर्स

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडन यांनी द्विपक्षीय चर्चेदरम्यान नवीन सेमीकंडक्टर निर्मिती प्रकल्पाची स्थापना करण्यासाठी झालेल्या सहमतीचं स्वागत केलं. या प्रकल्पात राष्ट्रीय सुरक्षेसाठी सुदूर संवेदन, संप्रेषण आणि प्रगत इलेक्ट्रॉनिक्स, भविष्यातील दूरसंचार आणि पर्यावरणपूरक प्रणाली यांच्यावर भर असेल, असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं सांगितलं. या कारखान्यात इन्फ्रारेड, गॅलियम नायट्राइड आणि सिलिकॉन कार्बाइड सेमीकंडक्टर तयार करण्यात येतील. भारत सेमीकंडक्टर मिशन तसंच भारत सेमी, थ्रीडीटेक आणि अमेरिकी अंतरिक्ष दल यांच्या भागीदारीतून याची निर्मिती होणार आहे.

मोदी चर्चा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज न्यूयॉर्कमध्ये भारतीय प्रमाणवेळेनुसार पहाटे कुवेतचे राजपुत्र शेख सबाह अल-खालिद अल-सबाह यांच्याशी द्विपक्षीय चर्चा केली. दोन्ही देशांमधले संबंध आणखी दृढ करण्याबाबत दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाली. मोदी यांनी नेपाळचे पंतप्रधान के. पी. शर्मा ओली यांच्याशीही भारत-नेपाळ भागिदारी वाढवण्याबाबत चर्चा केली. सीईओ राऊंडटेबल या कार्यक्रमात त्यांनी उद्योजकांशी चर्चा केली. होल्टेक इंटरनॅशनलचे डॉ. कृष्णा सिंह यांच्याशीही संवाद साधला आणि आण्विक ऊर्जा क्षेत्रात सहकार्य वाढवण्याबाबत चर्चा केली.

श्रीलंका निवडणूक

श्रीलंकेत नॅशनल पीपल्स पॉवर पक्षाचे प्रमुख अनुरा कुमार डिस्सानायके यांनी मतमोजणीच्या दुसऱ्या फेरीत अध्यक्षपद निवडणुकीत विजय मिळवला आहे. त्यांनी समागी जन बालावेगया पक्षाचे साजित प्रेमदासा यांचा पराभव केला. अध्यक्ष रानिल विक्रमसिंघे निवडणुकीत पराभूत झाल्याचं निवडणूक आयोगानं जाहीर केलं आहे.

अध्यक्षपदासाठीच्या पहिल्या फेरीत कोणत्याच उमेदवाराला पन्नास टक्के मतं न मिळाल्यामुळं मतमोजणीची दुसरी फेरी घेण्यात आली. काल हे मतदान झालं आणि तिथल्या निवडणूक आयोगाच्या मते ही निवडणूक श्रीलंकेच्या इतिहासातली सर्वांत शांततापूर्ण निवडणूक होती.

विश्व-अन्न

वर्ल्ड फूड इंडिया २०२४ या प्रदर्शनाची काल नवी दिल्लीत सांगता झाली. भारत मंडपम इथं १९ सप्टेंबरपासून सुरू झालेल्या प्रदर्शनात नव्वद देश आणि भारताच्या २६ राज्यांनी भाग घेतला होता. अन्नप्रक्रिया क्षेत्रात भारताच्या दबदबा वाढत असल्याचं या प्रदर्शनानं अधोरेखित केलं. या क्षेत्रातील नावीन्य, तंत्रज्ञान, शाश्वतता यांच्याबाबत अनेक गोष्टी त्यात सादर करण्यात आल्या. भारतानं अशा प्रकारचं आयोजित केलेलं हे तिसरं प्रदर्शन आहे. जपान हा भागिदार देश होता, तर व्हिएतनाम आणि इराण यांना हे यंदा प्रदर्शनासाठीचे विशेष देश होते.

अन्न-सुरक्षितता

भारतीय अन्न सुरक्षा आणि प्रमाण प्राधिकरणानं ब्राझिलमधील कृषी आणि पशुधन मंत्रालयाबरोबर अन्नसुरक्षेबाबत करार केला आहे. याबाबतच्या करारावर काल नवी दिल्लीत ब्राझिलचे कृषिमंत्री कार्लोस हेन्रीक फवारो आणि प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी जी. कमला राव यांनी सह्या केल्या. विविध संयुक्त प्रकल्प आणि तंत्रज्ञानविषयक भागिदारी यांच्यातून अन्नसुरक्षा सुधारण्यावर या करारात भर देण्यात आला आहे.

विद्यार्थी-शुल्क

यूपीएससी परीक्षा, आयआयटी तसंच इतर विविध प्रवेश परीक्षांसाठी विविध प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना एक कोटी रुपयांपर्यंत शुल्क परतावा मिळवून देण्यासाठी सरकारनं मदत केली आहे. १९१५ या राष्ट्रीय ग्राहक हेल्पलाइनवर ६५६ विद्यार्थ्यांनी तक्रार केली होती. त्यानंतर हा परतावा मिळवून दिल्याचं ग्राहक व्यवहार मंत्रालयानं म्हटलं आहे.

अनेक संस्था विशेषतः खासगी शिकवणी वर्ग शुल्क परतावा मिळवून देण्यात टाळाटाळ करत असल्याच्या तक्रारी मिळाल्यानंतर ही विशेष मोहीम राबवण्यात आली. गेल्या बारा महिन्यांच्या काळात १६ हजार २७६ विद्यार्थ्यांनी या हेल्पलाइनवर विविध तक्रारी केल्या आहेत.

आसाम-स्फोटकं

आसाममध्ये स्वातंत्र्यदिनी स्फोटकं पेरल्याच्या संशयावरून आसाम पोलिस आणि राष्ट्रीय तपास संस्था यांनी पंधरा जणांना अटक केली आहे. आसाम पोलिसांनी काल जाहीर केलेल्या एका निवेदनात ही माहिती दिली आहे. अटक केलेल्यांमध्ये तीन महिलांचा समावेश असून, तीन वेगवेगळ्या ठिकाणी कारवाई करून ही अटक करण्यात आली, असं आसाम पोलिसांनी म्हटलं आहे. सहा जणांना दिब्रुगड आणि लक्ष्मीपूर जिल्ह्यांमधून, तर जोरहाट आणि गुवाहाटीमधून प्रत्येकी चार जणांना अटक करण्यात आल्याचं आमच्या प्रतिनिधीनं कळवलं आहे.

भारत गौरव रेल्वे

भारतीय रेल्वे आयआरसीटीसी म्हणजे भारतीय रेल्वे खाद्य आणि पर्यटन महामंडळ आणि उत्तराखंड पर्यटन महामंडळ यांच्या सहयोगानं केदारनाथ, बद्रिनाथ आणि इतर तीर्थक्षेत्रांसाठी भारत गौरव रेल्वे सुरू करणार आहे. भारत गौरव मानसखंड एक्स्प्रेसमार्फत बद्रि-केदार-कार्तिक स्वामी यात्रा सुरू करण्यात येणार आहे. ही अकरा दिवसांची यात्रा असेल आणि त्यात ऋषिकेश, रुद्रप्रयाग, केदारनाथ, कार्तिक स्वामी मंदिर, ज्योतिर्मठ आणि बद्रिनाथ यांचा समावेश असेल. छत्रपती शिवाजी महाराज स्थानकातून तीन ऑक्टोबरला दुपारी दोन वाजता ही यात्रा सुरू होईल आणि त्याच स्थानकावर १३ ऑक्टोबरला दुपारी दोन वाजता परत येईल. प्रवासी कल्याण, पुणे, दौंड, मनमाड, खांडवा, इटारसी, भोपाळ, ग्वाल्हेर, हजरत निजामुद्दिन आणि हरिद्वार इथून रेल्वेत चढू किंवा उतरू शकतात.

बांगलादेश निवड

बांगलादेशविरुद्ध होणाऱ्या दुसऱ्या कसोटी सामन्यासाठी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या निवड समितीनं संघाची घोषणा केली आहे. पहिल्या सामनातलाच संघ कायम राहणार असल्याचं समितीनं स्पष्ट केलं आहे. कानपूरमध्ये येत्या २७ तारखेला हा सामना खेळला जाणार आहे. पहिल्या सामन्यात भारतानं बांगलादेशचा चौथ्याच दिवशी २८० धावांनी पराभव केला होता.

बुद्धिबळ स्पर्धा

हंगेरीत बुडापेस्ट इथं 45 व्या  बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये भारतानं ऐतिहासिक दुहेरी सुवर्णपदकं जिंकली. पुरुष आणि महिला दोन्ही संघ अव्वल स्थानावर राहिले. अर्जुन एरिगाइसीने स्लोव्हेनियाच्या जान सुबेलज या  प्रतिस्पर्ध्याविरुद्ध विजय मिळविल्यानंतर अंतिम फेरीत भारतीय संघाचं सुवर्णपदक निश्चित झालं. दुसऱ्या स्थानावर असलेल्या चीनने अमेरिकेच्या खेळाडुकडून महत्वपूर्ण अंक गमावल्यानंतर भारताचा विजयाचा मार्ग जास्त सुकर झाला  भारताच्या खुल्या पुरुष गट संघात गुकेश डी, प्रग्गनानंद आर, अर्जुन एरिगायसी, विदित गुजराती, पेंटाला हरिकृष्णा, आणि श्रीनाथ नारायणन यांचा समावेश होता. पुरुष गटात  या स्पर्धेत भारतीय संघाने आतापर्यंत 2014 आणि 2022 मध्ये कांस्य पदक जिंकून सर्वोत्तम प्रदर्शन केल होत, यावेळी सुवर्णपदक मिळवण्याचा मान  मिळाला आहे.   महिला विभागाच्या अंतिम फेरीत भारतानं अझरबैजानचा पराभव करत सुवर्णपदक जिंकलं. भारताच्या महिला संघात हरिका द्रोणावल्ली, वैशाली रमेशबाबू, दिव्या देशमुख, वंतिका अग्रवाल, तानिया सचदेव सहभाग होता.

# **याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**